# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२६/०६/२०१६.

**१) अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवुन गर्भधारणा करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद.**

मे २०१५ ते नोव्हेंबर २०१५ पर्यंत फिर्यादी अल्पवयीन पिडीत मुलगी वय १७ वर्ष, हीला आरोपीने लग्नाचे आमिष दाखवुन तीच्या सम्मतीने तिच्याशी ४ वेळा शारीरीक संबंध प्रस्थापीत केले, त्यामुळे पिडीत मुलगी ही ७ महीण्याची गरोदर झाली. आरोपी हा पिडीत मुलीला गर्भधारणा करण्यास कारणीभुत झाला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६(जे)(एन) भादंवि सहकलम ३(१),४ लैंगिक अपराधापासुन बालकाचे अधि. २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन मारहान करून जखमी केले. :—**

दिनांक २३/०६/०१६ रोजी २३.०० वा. दरम्यान फिर्यादी चैतराम सिताराम पचारे वय ३५ वर्ष, रा. वार्ड नं. १ लाखनी हे त्यांच्या घरी हजर असतांना तिन्ही आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीचे घरी जावुन ''तु मोहण पचारे याला काठीने मारहाण केली, त्यामुळे पो.स्टे. ला चल'' असे म्हणुन भांडण केले व आरोपी क्र. १ ते ३ यांनी हाताबुक्यांनी फिर्यादिच्या उजव्या गालावर, उजव्या कुशीवर मारहाण करून दुखापत केली व इतर ५ ते ६ आरोपीतांनी फिर्यादीला ओढतान व ढकलढुकल केल्याने फिर्यादी हा खाली पडुन त्यांच्या गुडघ्यांना मार लागला. असे फिर्यादीचे बयाण व डॉ. अहवाला वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,४४७,१४३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. कोसरे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**३) शुल्लक कारणावरून पत्नीला मारहान केली. :—**

दिनांक २२/०६/०१६ रोजी ११.३० वा. दरम्यान फिर्यादी सौ. निरूपा राधेश्याम वाघमारे वय ३१ वर्ष, रा. बाजार टोली शहापुर हिचा पती हा शौचास जातो म्हणुन घरा बाहेर निघाला, फिर्यादीने ''घरी पाहुणे आले आहे, म्हणुन तुम्ही बाहेर जावु नका'' असे हटकले, यावरून फिर्यादीच्या पतीने रागात येवुन बाभळीच्या काठीने फिर्यादिला पाठीवर, डोक्यावर मारून जखमी केले. असे फिर्यादीचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३२६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.

**४) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी. :—**

दिनांक २५/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. करडी, तुमसर, पवनी व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १९ लिटर हातभट्टी दारू कि. १७००/—रू. व ४६८ लिटर देशी दारू कि. ७,५०,०२९/—रू. तसेच जुगारातुन कि. १८७/—रू. असा एकुण कि. ७,५१,९१६/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.